सभोव काळ

प्रनाद

प्रवीण नारायण दवणे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहेत

सभोव काळ

काव्यसंग्रह

प्रवीण नारायण दवणे

सभोव काळ

कवी: प्रवीण नारायण दवणे

पत्ता - ' नानातरंग ' वासुदेव चौक,

मु.पो.ता.डहाणू.जि.पालघर

पिनकोड - ४०१६०१

फोन- 98902 95272

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे, तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages, and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन: ३० एप्रिल २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई -साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

मनोगत

झोडणी या चारोळी काव्यसंग्रहानंतर ' सभोव काळ ' हा काव्यसंग्रह ई साहित्य प्रकाशनाच्या माध्यमातून आपल्या समोर ठेवित आहे. सभोवताली घडणाऱ्या घटनांचे काव्यस्वरुपात लिहिण्यामागेउद्देश हाच आहे की पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात वाटचाल करीत असताना आपल्या परीसरातील व सभोवताली घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब संपादकीय लेखनातून व झोडणी चारोळीद्वारे मांडत आलो, त्याच बरोबर सामाजिक, राजकीय व

जनमानसांच्या हृदयातील आक्रोश, चिड,हु रहूर, आजुबाजूची असंवेदनशीलता, मानवी जीवन जगताना विसरलेले आत्मभान , असहिष्णूता, निसर्गाप्रती होणारी हेडसाळ व मानवी षंढपणा हे मनाला चिड आणिती होते ते व्यक्त होण्यासाठी लेखणी हेच एकमेव माध्यम असल्याने मी काव्यरचना करीत गेलो व सोशल मिडियावर पोस्ट करीत राहिलो त्यातून प्रतिसाद मिळत गेला व लिखाणाची धार अधिक तिव्र झाली. या साऱ्या रचना 'सभोव काळ' या काव्यसंग्रहात प्रकाशित करण्यात आल्या आहेत. त्यासाठी ई साहित्य प्रकाशनच अध्यक्ष माझे मित्र सुनीळ सामंत यांना ई साहित्याच्या माध्यमातून ह्या रचना प्रकाशित करण्याचा मनोदय व्यक्त केल्यावर तात्काळ सहमती दर्शविली व ई साहित्य प्रकारातील माझा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित होण्यामागे सुनील सामंत यांचा मोठे सहकार्य मिळाले. त्याचे मी आभार व्यक्त करतो.

खरं तर माझा पिंड लहानपणापासून चित्रकारीतेचा होता. शालेय जीवनात खुप आवड होती. महाविद्यालयीन शिक्षण जे. जे. स्कुलमधे घ्यावे अशी इच्छा असताना अपघाताने बांद्रे येथील चेतना महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथे वाणिज्य शिक्षणात मन रमत नव्हते. अशा स्थितीत माझ्यातला चित्रकार जागा होता. तेथून पुढे योगायोगाने मला म्युरल्स काढण्यासाठी जुहू स्किमच्या आलिशान भागात संधी मिळाली. तेथे बरीचशी कामे केल्यावर डहाणूतील घरगुती अडचणींमुळे मुंबई सोडली व डहाणूला स्थाईक होऊन छोटासा कटलरी उत्पादनाचा कारखाना सुरू केला. हे करीत असताना सामाजिक प्रश्न, समस्या, युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामे करीत असताना पत्रकारीतेत प्रवेश केला.

त्याच बरोबर काव्य लेखनाचीही सुरूवात झाली. मुंबई,वसई,डहाणू भागातील दैनिकात सुरुवातीला वार्ताहर म्हणून सुरुवात केल्यावर वसईहून प्रकाशित होणाऱ्या दैनिकाचा उपसंपादक, स्थानिक दैनिकाच्या कार्यकारी संपादक म्हणून अनुभव घेतल्यावर स्वतः चे हक्काचे साप्ताहिक सुरू करण्याचा निर्णय घेऊन २००१ साली जेष्ठ नाटककार पद्मश्री प्रभाकर पणशीकर यांच्या हस्ते आजचा तटरक्षक या साप्ताहिकाचे प्रकाशन करण्यात आले. यातून राजकीय, सामाजिक, साहित्यिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या दिग्गज मंडळींची ओळख झाली. त्यातूनच साहित्य क्षेत्रात काम करणारे साहित्याचार्य पंढरीनाथ तामोरे, कवीवर्य जनार्दन पाटील, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, केळव्याचे साहित्यिक आर. एम. पाटील, प्रा. अशोक ठाकूरसर आदी म़ंडळींच्या सानिध्यामुळे साहित्य क्षेत्रात साहित्यिक कार्यकर्ता म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यातूनच कोकण मराठी साहित्य परिषदेची डहाणूशाखा व जव्हार शाखा माझ्या सहकाऱ्यांच्या पुढाकारामुळे निर्माण करता आली. आज मी पालघर जिल्हाध्यक्ष म्हणून साहित्यिक जबाबदारी पार पाडत आहे.

या प्रवासात अनेक मान सन्मान मिळाले,पण केलेल्या संघर्षाची जाण फक्त थोड्याच लोकांना माहित आहे. पैसा कमावला नसला तरी जीवाभावाची माणसे कमावता आली हेच भाग्य समजतो.

- प्रवीण नारायण दवणे

सभोवतालाचे ज्ञान देणारी
काळाचे भान देणारी
माझी पहिली शाळा म्हणजे माझे वडील
स्व.. नारायण (नाना) दवणे
यांचे चरणी
माझा हा पहिला काव्यसंग्रह
कृतज्ञतापूर्वक समर्पित

---- प्रवीण नारायण दवणे (प्रनाद)

काव्यानुक्रम

- आनंदयात्री
- आपला निर्णय
- जीवनाचा सोबती
- लाट
- जगावं
- माणसालय
- वेध
- निशब्द
- फसवणूकदार
- या आभासी जगात...
- लाईटवाला
- स्वप्नातले सुराज्य
- सागराशी हितगुज
- पुढारलेला माणूस
- परतीचा पाऊस
- भाग्य
- मीच हा डहाणूचा किल्ला
- पत्रकारांच्या वेदना
- आईची मतलबी मुले
- पूर्णाहुती
- इंद्रदरबार
- उखाळ्या पाखाळ्या
- फुकटचंद
- स्वाभिमान मांगेला
- ढोल
- एक सुर
- उन्माद
- बाप्पा
- आरती सत्तादेवाची
- इभ्रत
- उधारी
- विस्कटलेली स्वप्ने
- दिवा
- अमावस्येचा चंद्र
- स्वर्गातला नर्क
- हिंसेचे पुजारी
- असेल माझा हरी..
- या मातीचे पुत्र आम्ही
- तटबंदी



जीवन जगताना ....कर्म सोबतीला असतं
आयुष्य घडविताना.... स्वतः शिवाय दुसरं कोणी नसतं
संसाराच्या चाकांना सुध्दा... प्रेमाचे वंगण लागते
नसेल जर ते तर.... ते सुद्धा कुरकुरु लागते
जीवनाच्या वळणावळणावर... प्रेमाची हाक असते
आयुष्याच्या वाटेवरची...तीच खरी साथ असते
अनुभवांच्या बीजांवर...संसार उगवत असतो
मशागत करता करता... सुगंध पसरवत जातो
संसारातल्या कळ्यांची मग...फुले उमलूनी येतात

या फुलांची दरवळ मग ....कुटुंबे होऊनी जातात
दोन जीवांच्या नात्यांमधुनी...मग अनेक नाती होतात
संसाराच्या या वाटेवरती... सुखदुःखाचे अनुभव देतात
वाटेवरच्या यशअपयशात...सारे सोबती असतात
कधी तो तर कधी ती...अचानक निघूनी जातात
मग गतकाळच्या आठवणी.. केवळ हृदयात उरतात
जीवनाच्या प्रवासात मात्र...
कर्मेच सोबतीला असतात
खरतर...
आयुष्याच्या वळणावर त्या प्रारब्धाच्या गाठी असतात
येणारा प्रत्येक क्षण....आठवण करून देतात
निखळणारा एक एक दिवस...
अस्ताची जाणीव करून देतात
त्यातील वर्षातला एक दिवस मग..
आपला वाढदिवस होऊनी येतो
खरं तर...परतीच्या प्रवासाची तो आठवण करूनी देतो
हा दिन जरी शुभेच्छांचा ठेवा असला तरी...
तो हि काळाच्या आधीन असतो
परतीच्या प्रवासामधला तो एक
आनंद यात्री असतो.. तो एक आनंदयात्री असतो



आपला निर्णय

आता कामाला लागा !!
नाहितर ते कामाला लावतील.
घरी बसून स्वप्ने बघु नका
स्वप्ने धूळीत मिळाल्यावर
जागे होणार का ?
आता दिवसही वैऱ्याचा
होणार आहे.
आणि रात्र... काळरात्र होईल
तेव्हा झोपही येणार नाही !!
राजकारण्याची भाषाही
डुख धरलेल्या सापासारखी
विषारी असते
ते दबा धरून बसले आहेत
ठेक्यासाठी निविदेच्या
वासावर लक्ष ठेऊन !!
स्थानिकाच्या विरोधाच्या
भांडवलावर पत ठरविणणारे
नराधम आजुबाजूला असतील
हेच नराधम तेव्हा म्हणतील
चूकले माझे.क्षमा करा !!
तेव्हा वेळ निघून गेली असेल

आजूबाजुची राखरांगोळी
झालेली असेल !!
हे होण्याआधी सावध व्हा
आपला हक्क हिरावण्याचा
कुणाला अधिकार नाही !!
लढत रहा..यश आपलेच आहे
न्याय मिळण्यासाठी !!
इतिहासाने किती सोसले
किती मेले ह्याची कधी
गणती केली नाही !!
पण आज वर्तमान ऊभा आहे
इतिहास लिहिण्यासाठी !!
त्यात शौर्य गाथा लिहायची
कि पळपुटे म्हणून
इतिहासात नोंद करायची !!
हे आपले आपणच ठरवायचे आहे !!

जीवनाचा सोबती



तुच आहेस तुच तुझ्या
जीवनाचा सोबती
जा पुढे तु चालताना
मार्ग तुझ्या संगती

असेल खडतर वाट तुझी
ध्येय तुझ्या सोबती
तुच आहेस तुच तुझ्या
जीवनाचा सोबती

गाठ नवे शिखर तु
इच्छा असेल जागती
सत्य मनी असेल तुझ्या
शीव तुजला रक्षिती

तुच आहेस तुच तुझ्या
जीवनाचा सोबती

लाट

रोज नवी लाट येते
आशेवर जगण्याची पहाट होते
आश्वासनांचा अस्त झाला की..
जगण्याचा अंधार होतो

एक लाट येऊन अशीच
वचने भरभरून घेऊन आली
सत्तेसाठी स्वप्ने पेरून
खुर्चीवर आरूढ झाली

काळेधन सफेद झाले
हुजरे,मुजरे गंगेत न्हाले
घोटाळे अनं नोटाबंदी
सहिसलामत पचले गेले

लोकशाहीचा व्यापार झाला
स्वातंत्रात नफा तोटा आला
खरेदी विक्री नेत्यांची होऊन
सत्तेचा बाजार केला

एक लाट कोरोनाची आली
साऱ्यांची दैना केली
अविचारांची परीसीमा झाली
माणसे मरणात लोटली

एक लाट माणूसकीची
सत्व अनमोल वेचीत आहे
माणसातल्या माणूसकीची
वाट नवी शोधीत आहे

जगावं

माणसाने जगावं
जगाला बघावं
चांगलं वागावं
आनंदी रहावं

माणसाने शिकावं
दुसऱ्यांना शिकवावं
शिकवून घडवावं
जगाला जागावं

माणसाने झुकावं
देवाला भजावं
भजताना पुजावं
भक्तीने जगावं

माणसाने हसावं
हसत हसत जगावं
दुसऱ्यांना हसवावं
सुखदुःखांना वाटावं

माणसालय

आता पुस्तका ऐवजी
मी माणसेच अधिक वाचतो
अनुभवांची अक्षरे
डोळ्यांदेखत वेचतो
डोळ्या समोर साथ देणारी
मागून लाथ देणारी..
रस्वदिर्घ,काना, वेलांटी
प्रश्नचिन्ह निर्माण करणारी पात्रे
चालता बोलता वाचली जातात
काही अचानक पडद्याआड जातात
जीवाला जीव देणारी पात्रे
सदैव लक्षात राहतात
वाचताना सुखदुःखाचे प्रसंग
आनंद व चटका लावणारे
मदतीचा हात देणारे
तेच सोबती असतात
पुस्तकातील समाप्त न होणारी पात्रे
दिर्घकाळ स्मरणात असतात
पुर्णविराम नसलेली माणसालये
चालती बोलती वाचनालयेच असतात

वेध

कळत नकळत
सारे घडत आहे
हरवलेले ते क्षण
शोधण्यासाठी माणूस
आता धडपडत आहे
मुक्त फिरण फिरणे येण्या-जाण्यास
लक्ष्मण रेषा आखली आहे
रावणाच्या कोरोनाने
सुवर्ण म्रुगजीन घातले आहे
इतिहासात घडले होते
वर्तमानात तेच आहे
आता पात्रे बदलली
भुमिका तिच आहे
कपटी खलनायक
आजही तेच आहेत
कधी चायना कधी पाक
दानवांची पुनरावृत्ती होत आहे
प्रांत,देश,धर्म तेव्हा एक होता
युगा युगातला माणूस तोच आहे
बदलले नाव,धर्म आणि देश
वृत्ती मात्र तिच आहे

सत्तेसाठी प्रव्रुती आजही नीच आहे
या कलीयुगात जे घडत आहे
ते इतिहासाचा परिपाक आहे
भविष्याचा वेध या पुढे भयानक आहे

निशब्द

अचानक जाणे
निशब्द मन
आसवांच्या नेत्रात
वेदनांचे व्रण

कठोर काळ
हिरावतो वेळ
भरल्या अंगणात
क्रुर खेळ

अघटीत वेळ
जुळेना मेळ
कसा सावरु
पेटला जाळ

स्वप्ने उराशी
झोपेत लुप्त
उजाडण्या आधीच
पहाट सांज

फसवणूकदार

पक्ष असे सोईपुरता
सत्ता हेची साध्य
येथे तिथे जातो आम्ही
टाकीतो कात नव्याने

जात आमुची कोणती
हे सारेच जाणती
सत्तेसाठी क्षम्य सारे
हे सारेच मानती

अनितीची नाही भीती
मती गेली वाहून
लाज,शरम उरली नाही
इमान विकले स्वतःहून

मतलबी हे नाही कुणाचे
सेवक म्हणवती हे जनाचे
लोकशाहीच्या वाटेवरचे
फसवणूकदार हे देशाचे

या आभासी जगात...

आजच्या या आभासी जगात
कोण आपला आणि कोण परकं
ओळखणे कठीण असतं
अपरिचित ही सामिल होतो...
सुखाच्या आणि दुःखाच्या लाईकमधे !!
सोपं असतं मोबाईल वरून कळविणे...
संकटकाळी नसतात कुणी सोबतीला
कसोटीच्या काळात जे धावून येतात
तेच आपले असतात
बाकीचे दिलासा देणारे वाटसरू असतात
खडतर प्रसंगी मदत करणारे
आपुलकीचे हात असतात
खरे मित्र,नातेवाईक हेच आपले असतात
या आभासी जगात तेच आपले
तारणहार असतात
बाकीचे सांत्वनाचे हक्कदार असतात

लाईटवाला

लाईट येते काय न जाते काय
येथे कुणाचा थांगपत्ता नाय
फोन केला की आवाज येतो
खांबावर फॉल्ट हाय
येईल... दुरुस्त झाल्यावर !!
येईल च्या भरवशावर
एक तास निघून जातो
धामाच्या धारेने येथे भिजून जातो
लाहीलाही झाली की
पुन्हा फोन करतो
गरमागरमीतच सुनावतो
हरामखोर,एक तास झाला
अजून करतात काय !!
समोरून आवाज येतो
हाय टेंशन वायरमध्ये
मोठा फॉल्ट आहे साहेब
ओके झाला की येईल !!
आगपाखड करून फायदा नाय
हा लाईटवाल्याचाहा वायदा हाय बिल
भरल्याशिवाय सुटका नाय
तक्रार बिक्रारीचा फायदा नाय
लाईटवाल्याचा ढीला कायदा हाय

स्वप्नातले सुराज्य

पारतंत्र्यात लढले सैनिक
लढले प्राणपणाने
स्वराज्याच्या स्वप्नासाठी
लढले एकदिलाने

एकच ध्यास मनी ठेऊनी
दिला लढा एकजुटीने
जात,धर्म,पंथ एकवटले
स्वातंत्र्याच्या निर्धाराने

चले जाव लढा
स्वातंत्र्यसैनिकांचा धडकला
दिल्लीच्या तख्तावर
विजयी तिरंगा फडकला

स्वातंत्र्याचा रक्तरंजित लढा
बलीदानातून झाला सार्थ
स्वराज्याची स्वप्ने मात्र
ठरली आज निरर्थ

बलीदानातून साकारलेले स्वराज्य
दिसले नाही लोकशाहीचे राज्य
या सत्ताशाहीत आज हुतात्मे
शोधीत आहेत स्वप्नातले सुराज्य

सागराशी हितगुज

पावसात तू खवळतोस
तेव्हा सागरा..तुझ्या कुशीत
आम्ही येत नसतो...
तुझ्या जीवघेण्या लाटा तेव्हा
आम्ही अनुभवित असतो

कित्येक बांधव बुडालेत
तुफानी वादळात
पण आमुच्या पोटातलं वादळ..
शांत करण्यासाठी यावच लागते
संसारासाठी कधी कधी
प्राणाची आहुती आम्हाला
द्यावीच लागते...

तुझा अथांग सागर
करीतो आमचे पोषण
येण्याआधी किनारी आम्ही

नारळी पौर्णिमेला करीतो
तुझे श्रीफळाने पुजन

अलीकडे काही स्वार्थी
नीती,नियम सोडून
ओरबाडू लागला जेथेतेथे
मत्स्य संपदेचे अंगण
चोहीकडे लागली त्याची लागण
कधी थांबणार सांग रे

तुच पाहत आहेस
स्वार्थी लबाडांची कारनामे
पारंपारीक कष्टकरी मात्र
राबतोयं मरेपर्यंत येथे
पोटाची खळगी भरण्यासाठी

घामाचा प्रत्येक थेंबाथेंबातली
राकट अंगयष्टी जेव्हा....
हतबल होते जगण्यासाठी
तेव्हा सुड घेण्यासाठी
तुझी बनते मग त्सुनामी
किनाऱ्यावर आसुड ओढण्यासाठी -

पुढारलेला माणूस

इतिहासाची जाण
वर्तमानाचे भान
भविष्याचा वेध
न साधल्यानेच
पुनरावृती होऊ लागल्या
गझनी पासून इंग्रजांचा
इतिहास उगाळून प्यालो
फितूरीच्या नशेत
बेभान झालो
छत्रपतीचा इतिहास
जाणूनही आपण फक्त
जयंत्यांचे भाट बनलो
वर्तमानातील अन्याय
शोषण पाहूनही
आज नामर्द गणलो
जे पुर्वी होता
तो अन्याय आजही आहे
डोळ्यावर पट्टी
कानावर हात
तोंडावर बोट
आपली प्रतिक्रिया

माकडासारखीच आहे
गांधीजी तेव्हा अहिंसा
देऊन गेले
शेवटचा श्वास मात्र
हिंसा होऊन मेले
आज येथील इतिहास
रोज बदलू लागला
वर्तमानाच्या हातून आता
भविष्य वदवू लागला
पुढारलेला माणूस येथे
स्वतः पुरता जगू लागला

परतीचा पाऊस

सांज आकाशी
परतीचा मेघ
निरोप घेताना
गर्जु लागतो

कुणास ठाऊक
त्याची वेदना
आकाशी विजा
चमकु लागते

काळोखी विळखा
मायेच्या पाश
येथेही भावनांचा
कल्लोळ उठु लागतो

जाता जाता
गगनातूनी येथे
हिरवा गालिचा
पसरूनी जातो

दाद कुणाची

नाही म्हणूनी
शल्य मनीचे
गडगडूनी घेतो

पुढल्या वेळी येतानाही
गर्जत बर्जत
सुगंध मातीचा
घेऊनी येतो

भाग्य

तुझ्या कर्मात शोध तु जरा
तुझ्या भाग्याची दिशा

तुझ्या मनगटात आहे
तुझ्या जीवनाची दशा

तु असा निराश होऊ नको
कळोख पडला जसा

येईल पहाट पुन्हा
दिसेल वाट पुन्हा

तु असा निराश होऊ नको
भाग्य उजळेल तुझे पुन्हा

तुझ्या मनगटात आहे
तुझ्या जीवनाची दशा

तु असा धीर सोडू नको
तु अशी जिद्द सोडू नको

तुझ्या घामात आहे
तुझ्या श्रमाची दिशा

तुझ्या हातावर जरी नसेल
तुझ्या भाग्याची रेषा

तुझ्या विचारांच्या वाटेवर
शोध यशाची दिशा

तु असा निराश होऊ नको
झटक आळस तु जरा

चाल उठ आता तु पुन्हा
पुसून टाक हिशोब जूना

तुझ्या कर्मात शोध तु जरा
तुझ्या भाग्याची दिशा

मीच हा डहाणूचा किल्ला

उभा आहे तग धरून
पारंब्याच्या विळख्यात
वाट पाहत आहे माझ्या उध्दाराची...
तेव्हाच्या आरमारात
जखमी झालो असतो तर
बरे झाले असते
दिसल्या असत्या भींतीवर
गोळीबाराच्या खुणा.....
आज मी जे पाहत आहे
माझ्याच छाताड्यावर
गैर व्यवहारांच्या मसलती.....
मुडदे पडत आहे
निष्ठेचे आणि स्वाभिमानाचे
रक्तबंबाळ जखमा झेलीत
उभा आहे निशब्द...
वडपारंब्यांच्या विळख्यात.....
तटाच्या रक्षणासाठी जन्म माझा
पोर्तुगीजांच्या काळात झाला...
राणोजी शिंदे नी मला जिंकले
मराठ्यांचा झेंडा डौलाने फडकला.....
पण तहामधे इंग्रजांनी

मला जर्जर केले....
तोफांनी पाडल्या माझ्यातल्या इमारती
केली माझी कचेरी आणि कैद्यांखाना....
आज माझ्यासमोरील अतिक्रमणाने
मला झाकले
ऐतिहासिक वारसाला बकाल केले....
आज मात्र माझ्या अस्तित्वासाठी
सह्याद्री धाऊन आला आहे.....
प्रतिष्ठापनाच्या रूपाने आज
तोफगाडा सजवून ठेवला आहे.....
माझ्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा
दसऱ्याच्या शुभदिनी
पावन झाल्या आहेत..पावन झाल्या आहेत

पत्रकारांच्या वेदना

माध्यमांच्या आरशामधून
समाज दिसतो,राजकारणी दिसतात
पण... पत्रकारांच्या समस्या
त्यात कुठे दिसतात ?

आरशांचे मुलामे डागाळले की..
प्रतिमा खराब दिसतात
मुलामे पुसणाऱ्या पत्रकारांचे हात
त्यात कुठे दिसतात?

आरसा फुटला की तुकडे विखुरतात
प्रत्येक तुकड्याच्या प्रतिमेत
पत्रकारांच्या वेदना
त्यात कुठे दिसतात?

फुटलेले तुकडे संघटना चिकटवित बसतात
जोडलेल्या तुकड्यात
निष्ठेचेचेहरे
त्यात किती दिसतात?

पत्रकार दिनी सारे एकत्र येतात
आरसा पुसून स्वच्छ करतात
लेखणी झिजविणारे बुजुर्ग
त्यात किती दिसतात ?

आईची मतलबी मुले

राबणाऱ्या आईला
नसते कसली अपेक्षा
आशा असते एकच
म्हातारपणी मुलं जवळ असावी
लहानाचे मोठे करताना
राबराब राबणारी आईअसते
मुलांचे संगोपन करण्यासाठी?
रांधा,वाढा,उष्टी काढा
हिच असते तिची दिनचर्या?
स्वतःच्या स्वातंत्र्याला मुरड घालून ...
मुले स्वार्थी असतात हे तिला
शेवट पर्यंत कसे कळणार?
मुलांच्या दुर्बुद्ध चालीची आणि ...
छुप्या कुट- कारस्थानाच्या हालचालींची..
अनैतिकतेचा छुपा खेळ लपवूनी
विवाहाचा डाव खेळती मग..
खरा- खोटा कोण आहे
आईला कळणार कसे?
नियतीच्या फेऱ्यात अडकली
मुलांची अनिती...
स्वप्न भंग उराशी ठेऊनी

झुरते ती आई ...
तरीही जपते ती
नाते मुलांचे जीवापाड
मुले मात्र फिरती सोडून आईला
आपल्याच कुकर्माची लक्तरे घेऊन
दोषारोपाचे आरोप झाडीत
स्वतः ला झाकून उजळ माथ्याने
शिकवण देती ब्रम्हज्ञानाचे
दुसऱ्यांचे ज्ञान चोरूनी

पूर्णाहुती

विचारांतून निर्माण झालेली
विचारांची मालिका
जेव्हा निर्णय घेते
तेव्हा खरी कर्माची
भुमिका सुरु होते



मग देहातल्या मेंदुतल्या
आदेशाचे पालन
अवयवांना करावेच लागते
जखडलेल्या गात्रांना
कुठे ठाऊक असते

चांगल्या वाईटाची जाण
आदेश पाळावाच लागतो
देहाच्या कर्मासाठी
नवे काहीतरी शोधण्यासाठी
सुख म्हणजे नेमके काय असते
याचा कदाचित शोध घेण्यासाठी
सापडत नाही काही केल्या
संघर्षाचा अनुभव मात्र
सतत पिच्छा करीत असतो
सुखाच्या इच्छेसाठी
धावत असतो म्रुगजळामागे
अखेर पर्यंत..
जोपर्यंत भासाचा भ्रमनिरास
होत नाही तो पर्यंत....
अखेरच्या श्वासापर्यंत
शोधत राहतो स्वप्नातलं वास्तव
ते मेल्यावरही सापडत नाही
विचारांनी केलेल्या विचारांना
पुर्णाहूती मिळत नाही तो पर्यंत

इंद्रदरबार

गेलो होतो एकदा
इंद्राच्या दरबारी
पाहतो तर काय..
रांगा लागल्या होत्या
पाण्यासाठी...
प्रुथ्वी वरचे नेते
आले होते मागणी साठी
थेट प्रुथ्वीवर पाइपलाइन
टाकण्यासाठी...
त्यात काही आंबट शौकीनही आले होते
अप्सरांना पाहण्यासाठी...
मी तेथून सटकलो
थेट गेलो कैलासावर...
तेथे श्री शंभो बसले होते
मी म्हणालो,महादेवा
तेथे अन्नाऐवजी
पैसे खाऊन लागले आहेत शंभो
महादेव म्हणाले ...
तैसी करणी वैसी भरणी
जातील ते नरकाच्या चरणी
मी निघालो ब्रम्हदेवा कडे

वाटेत चित्रगुप्त भेटले
म्हणे..जन्म आणि म्रुत्युची
आकडेवारी जुळत नाही
टेस्टट्युब जन्मांची संख्या कळत नाही
आधीच माझे गणित कच्चे
तेथून सटकलो आणि
 विष्णू गेलो देवाकडे
नारदमुनी तेथे बोलत होते
प्रभो...सज्जनांचे रक्षण
करणार कोण
विष्णू म्हणाले काळजी नको करू
हे मी आता करार करण्याऱ्यांवर सोडले
आहे..तेथून निघाल़ो
जाता जाता पाहु या
नरकाची सद्यस्थिती काय आहे
वाटेतच स्वागत झाले
शिव्यांनी आणि शापांनी
शिव्या देणारे ओळखीचे वाटले
आपल्याच देशाचे
राजकारणी दिसले
लफडेबाज,घोटाळेबाज
रडताना आणि सडताना दिसले
वाटले पळावे येथून...

नाहीतर येथेही पाय खेचतील
जरा पुढे गेलो
तेथे रेड्या विनाच यमराज दिसले
मी म्हणालो यमराजांना
रेड्याविना तुम्ही कसे?
ते म्हणाले मागील आठवड्यात
प्रुथ्वीवतलावर गेलो होतो
तेथे लिलाव सुरू होता रेड्याच्या
आठ कोटींची बोली झाली रेड्याची
म्हटलं आपल्याही रेड्याची
बोली होऊन जाऊ द्या की एकदाची
मरणाचे ॲडव्हास घेऊन
देऊन टाकला रेडा एकदाचा
यमराजाला माझी शंका आली
ते म्हणाले तु येथे
कसा काय आलास
मी म्हणालो माझ्याकडे
त्रैलोक्याचा पास आहे
यम म्हणाले दाखल तुझा पास
नाहीतर आवळतो माझा पाश
मी घाबरलो,मी गांगरलो
इतक्यात पहाटेचा कोंबडा करवला
आणि माझे स्वप्न भंग झाले

उखाळ्या पाखाळ्या

(वाचा पण मनावर घेऊ नका...कारण तुम्ही यातले नसाल)

हा म्हणतो तो बोगस आहे
तो म्हणतो हा असाच आहे

हा म्हणतो तो त्यांचा माणूस आहे
तो म्हणतो हा त्यांचा चमचा आहे

हा म्हणतो तो आतल्या गाठीचा आहे
तो म्हणतो याने तर दुकान थाटले आहे

हा म्हणतो त्याला लिहिता येत नाही
तो म्हणतो हा तर बोलबच्चन आहे

हा म्हणतो तो सेटींग बहाद्दर आहे
तो म्हणतो हा तर लफ्फंगा आहे

हा म्हणतो तो खंडणीखोर आहे
तो म्हणतो हा तर ब्लॅकमेलर आहे

हा म्हणतो छापण्याचे पैसे घेतो
तो म्हणतो हा तर न छापण्याचे पैसे घेतो

हा म्हणतो तो तर चमकेश आहे
तो म्हणतो हा पुढेपुढे करण्यात पटाईत आहे

हा म्हणतो तो तर पैसै खातो
तो म्हणतो हा आधी लिहितो मग सेटींग करतो

हा म्हणतो त्याला तर दोन नंबरवाल्यांकडून पैसे येतात
तो म्हणतो ह्यालातर घर बसल्या पाकिटे येतात

हा म्हणतो त्याच्यामुळे आमची बदनामी होते
तो म्हणतो यानी तर सर्वांना बिघडविले

हा म्हणतो त्याला तो नेता पोसत आहे
तो म्हणतो हा तर त्याच्या जीवावर जगत आहे

फुकटचंद

फुकट मिळालेल्या वस्तुची किंमत कुठे?
आयतं मिळालेल्यांना श्रम कसले?

वापरून कस काढल्यावर खंत कसली?
रद्दी झाली झाली पहात बसतील
बकालपणा अंगात नासवतील
आपल्याच कर्माची दुषणे दुसऱ्यांना देतील

स्वत:च्याच आयुष्याची पडझड पहातील
दुसऱ्याच्या कर्माचा दोष शोधूनी
सत्य झाकूनी आपुले तत्वज्ञान झोडतील
न केलेल्या कर्माचा हिशोब मागतील

फुकटचंद असे भेटतील आजुबाजूला
तोऱ्यात जगी उपदेश देतील
मग स्वत:च्या कर्माचे दोष दैवाला देतील

स्वाभिमान मांगेला

होय,मी मांगेला,मी मांगेला
माझे पुर्वज मांगेले
किनारा आहे साक्षीला
कष्ट आणि जिद्द पुर्वजांच्या पाठीला
शिक्षित केले लेकरांना
घेतली भरारी मग सोडूनी किनारा
शोधला मग जगण्याचा मार्ग नवा
प्रशासन,खाजगी नोकरीचा संसार नवा
नाळ होती गावाशी जुळलेली...
येणे जाणे हेच जीवनगाणे
बोलती मांगेली,चालीरिती मांगेली
टिकवूनी आज चालतो ताटमानेने
भेटतो सुखदुःखात एकमेका मायेने
मांगेला मी या युगाचा राहतो स्वाभिमानाने
लपवित नाही जात,वावरतो गर्वाने

ढोल

तिच डोकी तेच ढोल
वाजवत आहेत गोलगोल
तेच शब्द तेच बोल
जूने गाणे नवा तोल

तोच समुह वारंवार
इथली तिथली डोकी चार
आलटून पालटून बदली भार
तोंड दाबून बुक्का मार

तेच नाव तेच गाव
तोच राव तोच सराव
रचना तिच शब्द फिरव
तिचं माणसे तोच ठराव

सारखं सारखं तेच तेच
पुन्हा पुन्हा वेच वेच
जुन्यानव्यात रस्सी खेच
बुडाखाली छेद छेद

तुझं माझं पटेना
मी पणा हटेना
तुझं माझे करताना,
वाद काही मिटेना

एक सुर,एक ताल
बोलताना दिसेना
अंधाराच्या वाटेवर
उजेड काही दिसेना

एक सुर

एक सुर,अनेक ताल
महागाईने केले हाल
जी एस टी अनं नोटबंदी
सत्तेमधली मोठी चांदी
काळेधन गोरे झाले
कर्जमाफीने पावन केले
आत्मनिर्भर लोकांना
महागाईत लपेटले
सबका साथ बोलून बोलून
शेतकऱ्यांना उघडे केले
उज्वला गॅसच्या सिलेंडरला
महागाईची वात लावली
एक सुर,अनेक तालाने
गरिब जनता बेहाल केली
फसवे भाषण खोटे राशन
ठरलेल्यांनाच केले रोशन
बाकी जनता मतापुरती
निवडणूकी पुरती डोलती
मिळून मिसळून खाणाऱ्यांची
येथे आहे चलती
उघड उघड बोलणाऱ्यांची
बंद येथे बोलती

उन्माद

विस्मर्टला तो सटकलेला
घुसटखोर मुस्कुटलेला
भ्रांतीष्ट तो वळवळणारा
निपचित पडला गुहेत
डोहात असंख्य मर्दन
तुटून पडती कोषामधे
वासनेचा अक्षय विळखा
डाव साधला जन्माने
असंख्य म्रुत्युचा खेळ
अनादी काळाचा मेळ
दिवस रात आघात
मोहमायेचा शक्तीपात
चाले अनंताचा उन्माद

बाप्पा

बाप्पा तुम्ही येताना
सांभाळून या !!

येथे बदलली आहे
तुझ्या स्वागताची रित
फटाके,डिजे ऐकून
तुझे कान होईल अनफिट....

तुझा आरास आता
चायनिज फुलानी सजतो
कागदी नकली फुलात
सुवास कुठे असतो ?...

आता चायनीज अगरबत्ती
तुला प्रसंन्न करणार म्हणे
त्यातील विषारी गंधाने
भक्तगण आजारी होणार म्हणे..

तुझ्या प्राणप्रतिष्ठेआधी
पुरोहिताचे पाय धरावे लागते
पुजेच्या आरक्षणासाठी
पाळत ठेवावी लागते...

आरती म्हणजे प्रार्थना
ओरडून करावी लागते
मनात नसला भाव तरी
लोटांगण घालावे लागते...

दिवा विझु नये म्हणून
रात्र जागावी लागते
येथे मानवी मनोरंजनासाठी
बिदागी मोजावी लागते...

तु सृष्टीकर्ता समजून
तुला साकाररूपे पुजितो
मांगल्याचे प्रतिक म्हणूनी
श्रद्धावंत तल्लीन होतो....

राजा..आज तुझ्या नावाचा
बाजार सुरू झाला
भक्ती ऐवजी तुझ्या अलंकाराचा
लिलाव सुरू झाला ....

म्हणूनच.. बाप्पा तुम्ही येताना
सांभाळून या !!

आरती सत्तादेवाची

जय देव जय देव जय सत्ता देवा
आरती ओवाळीतो मी तव चरणा ।।

तुमचे कारणे झालो खुर्चींचा धनी
सरपंच,नगर,जिल्हा काबीज करूनी
मतासाठी केले नको ते खेळ ।।

विरोधकांना दाबूनी रचले मी डाव
पूर्ण केली त्याची थैलीची हाव ।।

बहुमतासाठी केला घोडा बाजार

दुर केला त्यांचा अर्थाचा आजार ।।

थैली देऊनी श्रेष्ठी खुष मी केले
मंत्रीपदासाठी नाव पुढे आले।।

गाडी,बंगला,भत्ता आणि मनसोक्त सत्ता
गिरवितो मी देवा तुझाच हा कित्ता ।।

कोणी निंदो,कोणी वंदो नाही त्याची चिंता
जेथे जाऊ तेथे खाण्याचा धंदा ।।

तुला पुरवितो मी नित्य निधीचा वाटा
काढतो लपून काटा विरोधकांचा ।।

सरशी ज्या पक्षाची देवा तेथे मी जातो
निष्ठा सोडूनी देवा त्यांचा मी होतो ।।

तुझ्याच चरणाची आस देवा आज मजला आहे
वारस माझा देवा तुझ्या चरणी उभा आहे ।।

आश्वासनाचा भंडार मज पाशी आहे
प्रसंन्न हो देवा तुझा दास वाट पाहे ।।

इभ्रत

बापजाद्यांच्या घराची
इभ्रत वेशीवर टांगते
तेथे संस्काराचे धडे
सांगा कुठे असते ?

राहतं घर जेव्हा
स्वतःच्या कष्टाचे नसते
देखभालीची काळजी
सांगा कुठे असते ?

कष्टाची किंमत जेव्हा
चुकविता येत नाही
आयत्या घराचे मोल
सांगा कुठे असते ?

इभ्रत आणि प्रतिष्ठा
कळत नाही जेथे
खोट्या देखाव्याची शोभा
सांगा कुठे असते?

नुसत्या घरांच्या भींती
संस्कारावीणा अबोल
बुजुर्गांचे खरे बोल
सांगा कुठे असते?

खोटी मिजास ज्यांची
खऱ्यास खोटा सांगतो
नियतीचा खरा न्याय
सांगा कसा असतो ?

उधारी

बरेच दिवस झाले
पहाटेची सायकलची
ट्रींग ट्रींग ऐकू आली नाही
पाव,बटर,टोस विकणारा
भैय्या अलीकडे दिसला नाही
पैसे नसले की उधार द्यायचा
उधारी दिली की खुष व्हायचा
पगार झाला की...
उधारी भैय्याची चुकवायची
हा नित्यक्रम होता..
या महिन्याची उधारी राहीली होती
गावी बहीणीच्या ...
लग्नाला गेलेला भैया
बरेच दिवस झाले आला नाही
कोरोनामुळे सकाळची वर्दळ थाबंली होती
पाव बटर मिळणे बंद होते
दोन दिवसाने येणारा भैय्या
अजून आला नाही...
वाचता वाचता पेपरच्या एका बातमीकडे लक्ष वेधले
यु.पी.तील कोरोनाबाधीत इसमाचा म्रुत्यु..

लिहीले होते त्यात ...
इसम घरोघरी सायकलने
पाव विकणारा विक्रेता होता
दोन दिवसाने परत येतो
म्हणून सांगणारा भैया
अजूनही आला नाही...
आजही वाट पाहतो पहाटेच्या

वाजणाऱ्या सायकलच्या घंटीची

विस्कटलेली स्वप्ने

पाणावलेल्या डोळ्यातला
अश्रुचा थेंबही सुकला होता
आईच्या कुशीतला तान्हा
दुधाविना झोपला होता

रणरणत्या उन्हात
चालण्याची शिक्षा दैवाने दिली
कोरोनाच्या भीतीपोटी
जगणयाची आशासमोर आली

हातावर पोट घेऊनी
मोलमजुरीने जगण्यात गेली
दारे आता बंद झाली
अन्नाविना जागण्याची वेळ आली

गाव तसे लांब कोसावर
जाण्यास वाहने बंद झाली
नशिब शोधण्या होतो आलो
हि मायानगरी स्तब्ध झाली

नाही कोणी कुणाचा वाली येथे
गावी परतण्याची वेळ आली
विस्कटलेली स्वप्ने घेऊनी
पुन्हा परतण्याची वेळ गेली

दिवा

दिवा जळत असतो
अंधाराला जाणीव नसते
प्रकाश देतो ज्ञानाचा
विझण्याची जाणीव असते

पसरलेल्या अंधाराला
दूर करणारा दिवाच असतो
पिळलेल्या वातीवर
थेंबथेंब तेलाचा दुवा असतो

प्रकाशाच्या किरणात
विझण्याची भीती असते
फुंकर मारणाऱ्या पतंगांना
निष्ठा कुठे ठाऊक नसते ?

अमावस्येचा चंद्र

रोजचे असे घरात राहणे
प्रेमाने जसे उरात राहणे
काळोख्यातल्या चांदण्यांना असे
अमावश्येच्या रातीत पाहणे

भ्रमराचे ते सैरभैर जीणे
फुलांफुलांमधे बिलगूनी जाणे
मध गंध फुलांचा पिऊनी
पराग घेऊनी जाणे

काळोख्या रातीतले असे जीणे
नभात अमावशेचा चंद्र पाहणे
मरणाच्या उत्सवाचे सोहळे
आपणच अश्रु पूसत राहणे

स्वर्गातला नर्क

मेल्यावरती कोण म्हणतो
असतो स्वर्ग आणि नर्क
मरणाऱ्यांनी कधी सांगितले ?
तो असतो केवळ आपला तर्क

धरतीवरच्या स्वर्गाला
सांगा केला कोणी नर्क ?
पर्यावरण बिघडवूनी येथे
शोधु लागला स्वर्ग

दुराचारी पापांचे भोग
निरपराधही भोगतो
सांगा आपणच आता
येथे न्याय कसा मिळणार ठोस ?

दिले भरभरून सारे काही
धरती सजीवांचा भार वाही
स्वार्थापाई विसरला मानव
लोटली धरती प्रदुषणाच्या खाईत

ओलांडल्या आचरणाच्या साऱ्या सीमा
निसर्गाचीही नाही पर्वा
दाईत्वाला विसरूनी स्वैराचारी
माणूसकीचा विसर पडला मानवा

मानवी दुराचाराचा भरला आता घडा
जाग माणसा आत्तातरी या क्षणी
पापक्षालन करण्यासाठी जग आता
कोरोनाचे हे प्रायश्चित्त झेल मानवा

हिंसेचे पुजारी

जीवंत मरण येथे आले
जगण्याचे मुडदे झाले
अहिंसेच्या मातीतूनी आज
सुड-आसुड उदयासी आले

जातपात अनं वर्णभेद
धर्मांचे नवनवे वितंडवाद
जो तो उरकी खोटावाद
हरपला येथला सुसंवाद

अर्थ हाच बनला आज
अस्तित्वाचा नवा माज
संघर्षाच्या वाटेवर आज
पिचला आहे सारा समाज

नाझीचा हिटलर गेला
हिंसेचा होता तो चेला
अमाणूषाचा तो जुलमी
अखेर तोही शोषून मेला

खोटी सत्ता खोटा माज
मुखवट्यांना नवा साज...
महात्मा गेले दुरात्मे आले
हिंसेच्या पुजाऱ्यांना कुठली लाज ?

असेल माझा हरी..

असेल माझा हरी
तर देईल खाटेवरी
यात आता अर्थ राहीला नाही
हरी असा सहजासहजी
कुणालाही पावत नाही
मेहनत करणाऱ्यावरच
हरी मेहरबान असतो
सुस्त बसणाऱ्यांवर
रूसून बसतो
भक्ती बरोबर ज्यांच्याकडे
असते श्रम आणि निष्ठा
चारित्र्याचे जगणे तेथे
हरीचा वास असतो
सदैव त्यांच्याकडे
खोटी भक्ती खोटी निष्ठा
खोटा आव ज्यांच्याकडे
हरी भुलवितो त्यांना मायेकडे
अहंकार सोडूनी जा शरण
हरी देतो भरभरून
लायक असणाऱ्यांना देतो
त्यांच्या सुकर्मांचे फळ
लायकी नसणाऱ्यांना
देतो कुकर्माची झळ

या मातीचे पुत्र आम्ही

या मातीचे पुत्र आम्ही
फसणार नाही आमिषाला
फसव्या विकासासाठी
आमिषे कितीही दिली तरी
विकणार नाही ही मायभूमीला

याच मातीतून घडलो
बागडलो,साकारलो आम्ही
जिवापाड जपले निसर्गाला
येथेच जगले,मेले पुर्वज
विकणार नाही हि मायभूमीला

नाळ आमुची या भूमीशी
संसाराची अनं संस्क्रुतीची
सुखात नांदतो या मातीत
विसरू कसे या नात्याला
विकु कसा या मायभूमीला

तटबंदी

हे चक्र चालूच आहे
लाट किनारी उसळत राहे
वस्ती येथील उधळत आहे
घोटाळ्यांच्या मालिकांची लाट
वाळू अलगद मिटवित आहे
खाणाऱ्यांची वरकमाई
योजनांचे ते बंधारे
आमिषात विखरूनी जाई
विश्वासाच्या तटबंदीवर
निविदेची दगड माती
टक्केवारीच्या पायावर
उभयता राहतात भग्नभींती
फायलीत दाबल्या जातात मग
आमिषांच्या चालीरीती !!

परिचय

प्रवीण नारायण दवणे
पत्ता - ' नानातरंग '
वासुदेव चौक,
मु.पो.ता.डहाणू,जि.पालघर
पिनकोड - ४०१६०१

मालक,प्रकाशक,संपादक - सा. आजचा तटरक्षक
पालघर जिल्हाध्यक्ष - कोकण मराठी साहित्य परिषद
माजी अध्यक्ष - ठाणे जिल्हा मच्छीमार समाज संघ
माजी सरचिटणीस - जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र
शाखा प्रवर्तक- को.म.सा.प.डहाणूशाखा

राज्यस्तरीय पुरस्कार

कोकण वैभव पुरस्कार
महाराष्ट्र दीप पुरस्कार

राजर्षी शाहु पंचरत्न पुरस्कार
साहित्य दरवळ पुरस्कार
संमेलन सारथी पुरस्कार

लक्षणीय : आजचा तटरक्षक मधील प्रकाशित झालेल्या किनारपट्टी भागातील ज्वलंत प्रश्न, समस्येचे पडसाद विधानसभा, विधानपरिषदेत उमटले. तारांकित, अतारांकित, लक्षवेधी प्रश्नांना तत्कालीन मुख्यमंत्री, संबंधित मंत्र्यांना उत्तरे द्यावी लागली.

आजचा तटरक्षक मधील प्रदुषणा संदर्भात प्रकाशित झालेल्या बातम्यांची दखल डहाणू तालुका पर्यावरण दक्षता प्राधिकरणाचे तत्कालीन अध्यक्ष न्यायमुर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी घेऊन संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना नोटिसा काढुन अहवाल मागविण्यास भाग पाडले.

चंद्र, फुले, मृग, तारे येती
जसे धरित्रीवर
तशी कविता रिझवित येते
ई साहित्यावर

खुप साऱ्या कविता वाचण्यासाठी
आपल्या सुंदर कवितांचा
आनंद इतरांना देण्यासाठी

ई-काव्यांजली

www.esahity.com
esahity@gmail.com
9987737237(Whatsapp)